Rotary | THE MAGIC OF ROTARY

# ROTARY CLUB OF KOLHAPUR CENTRAL NEWS

RI DISTRICT 3170 | CLUB NO. : 15656 | CHARTER NO. : 15656 | ESTD ON : 13.05.1978

## MONTHLY BULLETIN OCTOBER 2024



**Rtn. Stephanie Urchick**
Rotary International President



**Rtn. Sharad Pai**
District Governor (RID 3170)



**Rtn. Sanjay Bhagat**
Club President



**Rtn. Ravindra Khot**
Secretory



**Rtn. Nilesh Patil**
Treasurer

**ISSUE No. 01**
**PUBLISH DATE : 1 Nov. 2024**

**Bulletin Editor :**
**Rtn. Rohanraj Shinde**
**Rtn. Abhay Sonavane**




On behalf of Rotary Club of Kolhapur Central and Rotaract Club of Kolhapur Central, Shiv Shankar Secondary School, Sonali District, Radhanagari, District Kolhapur. In this school, school bags and geometry boxes and other school materials were distributed to the needy students of class 8th to class 10th.On this occasion, he interacted with the students and guided them about their careers. On this occasion, Rotary Central President Rtn. Sanjay Bhagat, Rtn. Naresh Shingade, Rotaract Central President Rtr. Aniket Sawant, Secretary Rtr. Chaitrali Shinde, Rtr. Ashutosh Parab, Rtr. Nikhil Chavan, School Principal and teachers were present.

Navratri festival Yin Police Mitra 2024 launched in association with Sakal Media Group's Young Inspirers Network and Police Administration. Rotary Club of Kolhapur Central has extended special support for this initiative and Rotary Club of Kolhapur Central will continue to work as a part of this initiative.In this, boys and girls students studying in colleges of different villages of Kolhapur district have spontaneously joined in this activity. Therefore, besides proving the leadership ability of these young men and women, they will get the fortune of being useful and this experience will definitely be useful in their career.






सकाळ

# वाहतूक सुरळीत करण्यासाठी 'यिन पोलिस मित्र' करणार मदत

नवरात्रोत्सवात कार्यरत; 'यिन'-जिल्हा पोलिस प्रशासनातर्फे उपक्रम

"सामाजिक बांधिलकी तरुणाईत असणे जरुरीचे आहे. यिनची तरुणाई नेहमीच वैविध्यपूर्ण उपक्रमांतून मदतीच्या भूमिकेत असते. यंदा पोलिस मित्र म्हणून ती रस्त्यावर उतरणार आहे. त्यातून त्यांचे नेतृत्व गुणांची कसोटी लागेल आणि नवरात्रोत्सवात चांगले काम केल्याचा आनंद मिळेल.
- संजय भगत, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल"

"यिन व माझे नाते घट्ट झाले आहे. त्याला कारण 'यिन'ची तरुणाई करीत असलेले समाजोपयोगी काम. यंदा नवरात्रोत्सवात पोलिस मित्र म्हणून काम करण्याची त्यांची मानसिकता शहरातील वाहतूक कोंडी फोडण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे.
- राहुल देशमुख, युवा उद्योजक"


Kolhapur, Kolhapur-Today 02/10/2024 Page No. 3



# कोल्हापूरचे ब्रँड ॲम्बेसिडर व्हा

जिल्हाधिकारी अमोल येडगे : 'यिन पोलिस मित्र' उपक्रमाचे उद्घाटन

यांचा पोलिसांना हातभार









पोलिसमित्र उपक्रम-२०२४

उत्कृष्ट स्वयंसेवक

नाव :

कॉलेजचे नाव :

सकाळ माध्यम समूहाच्या यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क अंतर्गत नवरात्र उत्सव कालावधीमध्ये कोल्हापूर शहरातील वाहतूक नियंत्रणासाठी जिल्हा पोलिस प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत **पोलिसमित्र** म्हणून आपण कर्तव्यदक्ष राहून जबाबदारी पार पाडली याबद्दल आपणांस हे **उत्कृष्ट स्वयंसेवक** म्हणून सन्मानित करण्यात येत आहे.

| महेंद्र पंडित | निखिल पंडितराव | यतीश शहा |
|---|---|---|
| जिल्हा पोलिस अधीक्षक, कोल्हापूर | संपादक, कोल्हापूर युनिट | सरव्यवस्थापक (दक्षिण महाराष्ट्र) |

विशेष सहकार्य
रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल



ऑक्टोबर महिन्याची पहिली वीकली मिटींग सोमवार दि.७ सप्टेंबर रोजी पार पडली. मिटींगचे अध्यक्ष व गेस्ट सेंट्रल क्लबचे सीनियर रोटेरियन रो.राजेश वोरा होते.

**मिटींगचे विषय खालील प्रमाणे**

१) घरगुती गौरी गणपती डेकोरेशन स्पर्धा बक्षीस वितरण.

२) अंध दिनानिमित्त Nab ची १०० सफेद काठ्यांची मागणी आहे.

**खालील क्लब मेंबर सफेद काठीसाठी डोनेशन दिले आहे.**

१) रो.सागर कामते–१००००.००
२) रो.स्वप्नील पाटील–२०००.००
३) रो.सागर चौगले–२०००.००
४) रो.शैलेश देशपांडे–२०००.००
५) रो.पंडित कोरगांवकर–२०००.००
६) रो.अभिजित भोन्सले–१०००.००
७) रो.विशाल पाटील–२०००.००

३) सकाळ मध्यम समूहा चा यीन पोलीसमित्र कार्यक्रमात रोटरी क्लब कोल्हापूर सेंट्रल चा सक्रिय सहभाग आहे.
४) विद्यामंदिर, आवंडी धनगरवाडा नं ३, चित्री प्रकल्प शेजारी, तालुका आजरा, जिल्हा कोल्हापूर...यांची दहा बेंचेस ची मागणी आहे.या महिन्यात बेंच द्यायचं मंजूर केलं आहे.
५) गणपती सजावट स्पर्धा विजेते खालीलप्राणाने आहेत.

All the clips are equally good. As per my judgment, the results are as follows
**No1.** Suyash Konduakar
**No2.** Nikhil Chavan
**No3.** Ashutosh Parab
**Consolation :** Rtn. Dr. Mahadev Narake.

सर्व विजेत्याना ट्रॉफी आणि गिफ्ट रो.राजेश वोरा यांच्या हस्ते देण्यात आले.

---

Rotary Club of Kolhapur Central's weekly meeting was held at Matoshree Vriddhasram to give all the Grandparents wishes for Dussehra.President Rtn.Sanjay Bhagat, Secretary Rtn.Ravindra Khot, Rtn.Jiya Momin, Rtn.Vijay Relekar, Rtn.Sagar Chowgule, all attended the meeting with their family and spent happy moments with the grandparents in the old age home. And got to experience how important it is to have a elder person in you house.Coincidentally, today was the birthday of Sahasrajit, the son of Rtn.Sagar Chaugule.Rtn.Jiya Sir and Rtn.Sanjay Bhagat made the atmosphere musical by singing favorite songs of grandparents. Wheat and rice were given to the ashram on behalf of Rotary Club of Kolhapur Central. And apples and bananas were given to everyone on behalf of Rtn.Sagar Chaugule.Everyone got emotional when the grandparents asked us all when will we come back next It was a great experience. And Thanks you to all of them who joined us.

## Meeting held at Matoshree Vriddhasram




October 15 - International White Cane Day. National Association for the Blind (NAB) on World White Cane Day Organized a rally of the blind people and organized a program of distribution of scholarship money to the blind children who are studying in eleventh, twelth, graduation and other courses at Rambhai Samani Hall Udyam Nagar.Rtn.Sanjay Bhagat, President of Rotary Club of Kolhapur Central attended the program as Chief Guest along with Rtn.Ravindra Khot, Secretary of Rotary Club of Kolhapur Central. NAB Secretary and Rotary Central's Senior Rotarian Mr. Vijay Relekar and Rtn.Jiya Momin were present.The rally was started by Mr. Anil Tanpure, Inspector of Police, Traffic Control Branch, Kolhapur and Rtn.Sanjay Bhagat, Rtn.Ravindra Khot.On this occasion, Rtn.Sanjay Bhagat, President of Rotary Central thanked NAB for giving him the opportunity to join the joy of the blind people by participating in this program and assured that Rotary Central will always be with NAB to help the blind brothers.On this occasion, on behalf of Rotary Club of Kolhapur Central, a check for 105 white cane sticks was handed over to NAB President Dr.Mr.Muralidhar Dongre.






तरूण भारत

# 'नॅब'तर्फे अंधांना सफेद काठीचे वाटप

## जागतिक सफेद काठी दिनानिमित्त जनजागृती रॅली

प्रतिनिधी
कोल्हापूर

जागतिक सफेद काठी दिनानिमित्त नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड शाखा कोल्हापूर (नॅब) च्यावतीने ५२ अंध बांधवांना सफेद काठीचे वाटप करण्यात आले. अंधांच्या सफेद काठीबाबत जनजागृती व्हावी, या उद्देशाने मंगळवारी सकाळी रॅली काढण्यात आली.

रॅलीचे उद्घाटन वाहतूक नियंत्रक शाखेचे पोलीस निरीक्षक डॉ. मनोज पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलचे प्रेसिडेंट संजय भगत, सेक्रेटरी रविंद्र खोत, संस्थेचे अध्यक्ष डॉ. मुरलीधर डोंगरे, सचिव विजय रेळेकर, संचालक शिवानंद पिसे यांची प्रमुख उपस्थिती होती. नॅबच्या शाहुपूरी येथील कार्यालयापासून रॅलीला सुरूवात झाली. येथून फोर्ड कॉर्नर, लक्ष्मीपुरी पोलिस स्टेशन, बिंदू चौक, कॉमर्स कॉलेज, उमा टॉकीज मार्गे उद्यमनगर येथील रामभाई सामाणी हॉल येथे सांगता झाली. या ठिकाणी मान्यवरांच्या हस्ते ५२ अंधांना मोफत सफेद काठीचे वाटप करण्यात आले.

कोल्हापूर : अंधांना सफेद काठीचे वाटप करताना डॉ. मनोज पाटील, संजय भगत, रविंद्र खोत, डॉ. मुरलीधर डोंगरे, ज्योती सावंत आदी.

महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या २० अंध विद्यार्थ्यांना ठाकूर बंधू यांच्यावतीने कै. लक्ष्मण ठाकूर व कै. शचिंद्र ठाकूर शिष्यवृत्तीचे धनादेशाचे वाटप करण्यात आले.

शिक्षण घेणाऱ्या अंधांचे कौतुक करुन संस्थेच्या या कार्यात आपण सदैव सहकार्य करु, असे आश्वासन संजय भगत यांनी दिले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. मुरलीधर डोंगरे यांनी स्वागत केले. जिया मोमीन यांनी सूत्रसंचालन केले. सचिव विजय रेळेकर यांनी आभार मानले. यावेळी जयश्री पिसे, ज्योती सावंत आदींसह अंध बंधूभगिनी उपस्थित होते.













दिनांक १५.०९.२४ ते २५/०९/२४ या दहा दिवसात डॉ.रो.सचिन फिरके सर यांच्यासह १२ कोल्हापूरकरांनी रो.विनोद कांबोज यांच्या नेतृत्वाखाली टीम एव्हरेस्ट बेस कॅम्प चा ट्रेक यशस्वी पणे पुर्ण केला .डॉक्टर साहेब आणि विनोद दादा यांचं खूप खूप अभिनंदन

---











This year too, like every year, the members of Achanak Mitra Mandal have made a replica of Vijaydurg fort in a very academically intricate way. To make this fort, the workers of the group visited the fort and studied the fort with its historical references President of Rotary Club of Kolhapur Central Rtn. Sanjay Bhagat worshiped the image of Chatrapati Shivaji Maharaj and cut the ribbon and opened the fort for everyone to see.

## लोकमत कॅम्पस क्लबतर्फे किल्ला बनवा स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकमत कॅम्पस क्लब आणि रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रलतर्फे शुक्रवार आणि शनिवारी सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत भव्य किल्ला बनवा स्पर्धेचे आयोजन केले आहे. यातील विजेत्यांना सन्मानचिन्ह, आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. स्पर्धेचे गिफ्ट पार्टनर भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र आहे.

स्पर्धेसाठी बनवलेल्या किल्ल्याचा एक फोटो व फक्त एक मिनिटाचा व्हिडीओ ९५४५३२७५४५ अमर यांच्या क्रमांकावर पाठवावा. यापेक्षा जास्त फोटो किंवा व्हिडीओ

CAMPUS CLUB | रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल

आयोजित




पाठवल्यास तो स्पर्धक स्पर्धेसाठी ग्राह्य धरला जाणार नाही. सोबत स्वत:चे नाव, वय, गट, किल्ल्याचे नाव, मोबाइल क्रमांक टाकावा. स्पर्धेसाठी सहा ते सोळा वयोगटातील मुलामुलींना सहभाग घेता येईल. पहिला वयोगट ६ ते १० वर्षे, दुसरा गट ११ ते १६ वर्षे आहे.

स्पर्धा दोन गटांत होईल. दोन्ही गटांतून तीन-तीन विजेत्या स्पर्धकांना सन्मानचिन्ह, तर सहभागी सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे सर्व अधिकार आयोजकांकडे राखीव ठेवण्यात आले आहेत.

यासंबंधीच्या अधिक माहितीसाठी ९५४५३२७५४५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.


























दिनांक २८ ऑक्टोंबर यावर्षीच्या दीपावलीचा पहिला दिवस वसुबारस चा दिवस दीपावलीपूर्व संगीतमय दीपसंध्याया संगीतमय कार्यक्रमाने आपण रोटरी क्लब ऑफ कोल्हापूर सेंट्रल च्या सर्व फॅमिली नी एकत्र येवून साजरा केला.पारंपरिक वेशभूषे मधे सर्वचजण आले होते त्यामुळे वातावरण अधिकच प्रसन्न झाले होते. सोबतीला श्री राम प्रस्तुत हे गित भावनांचेया वाद्यवृंदाची सुमधुर रसिकाना तृप्त करणारी गाणी होती.चकली चिवडा आणि दिवाळीच्या फराळाच्या चवीची गोडी होती .


खूप दिवसांनी भेटलेल्या मित्र मैत्रिणीच्या गप्पांचा फड होता. छोट्या मित्रांसाठी फटाक्यांची साथ होती .आणि शेवटी सात्विक जेवणाची पोटोबा तृप्त करणारे जेवनाची गोडी होती. यावेळी २७ ऑक्टोंबर रोजी हॉटेल सयाजी मधे पार पडलेल्या डिस्ट्रिक्ट अवार्ड कार्यक्रमात सेंट्रल च्या गेल्या वर्षामधील कामासाठी रो.सत्यजित पाटील ,रो.रविराज शिंदे,रो.डॉ.महादेव नरके सर,रो.शैलेश देशपांडे,रो.सूर्यकांत पाटील(अंकल)याना अवार्ड मिळाले त्याबद्दल त्यांचा सेंट्रल च्या सीनियर रोटेरियन च्या हस्ते सत्कार करण्यात आला.आम्हाला क्लब मेंबर म्हणून त्यांचा नेहमीच आदर राहिल.

यावर्षी डिस्ट्रक्ट गव्हर्नर यांनी खूप परिश्रम करुन मिर्झापूर उत्तरप्रदेश येथे पारंपरिक पद्धतीने बनवण्यात येणारी कार्पेट्स आपणाला खूप चांगल्या किमतीमध्ये उपलब्ध केली आहेत त्याचे सॅम्पल पिस व कॅटलॉग कार्यक्रम स्थळी सर्वांना पाहण्यासाठी ठेवले होते.सर्वांनी प्रतेकी एक किंवा त्यापेक्षा जास्त घेवून सहकार्य कराव अस आवाहन प्रेसिडेंट रो.संजय भगत यांनी केले.

या कार्यक्रमासाठी रो .स्वप्नील पाटील,रो अविनाश चिकनीस,रो.नरेश शिंगाडे यांनी विशेष मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार.

परत एकदा रोटरी क्लब ऑफ कोल्हापुर सेंट्रल च्या सर्व फॅमिली मेंबर याचे मनापासून आभार.

# BOD Meetings



Rotary club of Kolhapur central 2024-25

NOTICE

BOD Meeting

Notice is hereby given to all members of Rotary club of Kolhapur central 2024-25. The Monthly BOD Meeting of Oct. month of Rotary club of Kolhapur central 2024-25 will be held on 31st oct 2024 at 10.00am

Aggenda 1. Completion Of Work

2.RPL Disscission -Past President Meeting Date Finalised

3. Next Month Project Planning

4. Last BOD Meeting Discssion

5. Oct.24 Month Expenses

6.District Grant Project Discssion

7. District Sport Discssion

8. Any other subject with request of members

ठिकाण – Rtn. Sanjay Bhagat Home, Nagala Park, Kolhapur

All members are requested to be present on time

Time : 10.00am

Date : 31 oct 2024

| | | |
|---|---|---|
| Rtn.Sanjay Bhagat<br>President | Rtn. Ravindra Khot<br>secretary | Rtn.Nilesh Patil<br>Treasurer |









## OCTOBER 2024 BOD Date 3/11/2024

ठिकाण–प्रेसिडेंट संजय भगत यांच्या घरी.

### BOD मधील विषय खालीलप्रमाणे –

१)मागील BOD मधील विषय वाचून दाखवले.

२)ऑक्टोंबर महिन्यात झालेल्या प्रोजेक्ट ची माहिती देण्यात आली .

३)जुन्या वाहांच्या प्रोजेक्ट वरती काम करणे.

४)हणमंत वाडी स्कूल ची प्रोजेक्टर ची मागणी असून त्यासाठी दहा हजार डोनेशन जमा झाले आहे. टोटल ४००००.०० बजेट आहे.या प्रोजेक्ट साठी डोनेशन देण्यास इच्छुक असणाऱ्या मेंबर नी संपर्क साधावा.

५)ट्रेझरर रिपोर्ट क्लोज मीटिंग मधे सादर करणे.

६)बेळगांव येथे होणाऱ्या डिस्ट्रिक्ट कॉन्फरन्स साठी जास्तीत जास्त मेंबर नी रजिस्टर करावे असे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांनी आवाहन केले असून त्याप्रमाणे आपल्या क्लब मधील जास्तीत जास्त मेंबर रजिस्ट्रेशन करतील अशी अशी अपेक्षा आहे.कॉन्फरन्स साठी राष्ट्रीय लेवलचे वेगवेगळ्या क्षेत्रातील नामांकित वक्ते आपणाला ऐकायला मिळणार आहेत.उत्कृष्ट फूड क्वालिटी असणार आहे.उत्कृष्ट आदरातिथ्य असणार आहे.

७)DG करिअर मार्गदर्शन कार्यक्रम घेने. इंदुमती,देवी पार्वती.शिवाजी विद्यालय महागाव.

८)डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांनी सुचवल्याप्रमाणे मिर्झापूर उत्तरप्रदेश येथे बनवले जाणारे उत्कृष्ट दर्जाचे कार्पेट्स आपणाला सवलतीच्या दरामध्ये उपलब्ध करण्यात आले आसून प्रत्येकी एक किंवा जास्त कार्पेट घेवून सहकार्य करावे ही विनंती.

९)इन्स्टॉलेशन राहेलेले इनॅटरॅक्ट व आरसीसी कपिलेश्वर यांचे इन्स्टॉलेशन करणे.

१०)डिस्ट्रिक्ट स्पोर्ट्स २०,२१,२२ डिसेंबर ला होत असून त्यासाठी कमिटी नेमून त्यामध्ये भाग घेण्यासंदर्भात निर्णय घेणे.

११)हुबळी मिडटावून ने ७,८ डिसेंबर रोजी रोटरी चॅम्पियन लीग घेणार असून त्यामध्ये भाग घेण्यासंदर्भात त्यानी आपणाला अपील केले आहे.

१२)डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मा.शरद सर यांनी आपल्या क्लब मधून यावर्षी दोन मेजर डोनर देण्याची मागणी केली आहे व जे मेम्बर PHF नाहीत त्याना PHF करण्यासाठी अपील केले आहे .१००% क्लब PHF व्हावा अशी D G यांची इच्छा आहे.त्यासाठी मार्गदर्शन करण्यासाठी क्लब चे असिस्टंट गव्हर्नर रो.राहुल कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत.

१३) सर्व क्लब मेंबर ना रोटरी साईट वरती लॉगिन करण्यासाठी मदत आपले सीनियर रोटेरियन शैलेश देशपांडे सर करतील.

१४) आपल्या क्लब चा महत्त्वाचा इव्हेंट RPL संदर्भात कमिटी नेमून त्याची पुढील कार्यवाही सुरु करावी.

१५) सेंट्रल चे सीनियर मेंबर डॉ . मुरलीधर डोंगरे सर यांनी त्यांच्या घरी आम्हाला बोलवून त्यांच्याकडे असणारे क्लब चे जुने फोटो ट्रॉफी आम्हाला दिले व जुन्या आठवणी आमच्या बरोबर शेअर केल्या.

१६) क्लब चा मोठा हॉल योगासाठी एक योगा घेणारे मागत आहेत त्याचा निर्णय घेणे.

# पद्मविभूषण श्री.रतन टाटांकडून आपण शिकण्यासारखं !




भारतात असंख्य उद्योगपती, धनिक, सत्ताधीश होवून गेले, आणि आजही आहेत,पण मा.रतन टाटांच्या जाण्याने कोट्यवधी लोक ज्या उत्कटतेने गहिवरले,ती त्यांच्या परिपूर्ण जीवनाची पोच आहे, असं वाटतं.

त्यांच्या वैयक्तिक जीवनातील प्रगतीचा आलेख एका धीम्या गतीने चढत गेलेला आहे.त्यात कुठेही चमत्कारिक रितीने अचानक डोळे दिपवून टाकणारे यश मिळालेले दिसत नाही.

वयाच्या पन्नाशीपर्यंत त्यांनी त्यांच्या क्षमता जास्तीत जास्त विकसित केल्या.ते त्यांच्यावर सोपविलेली प्रत्येक जबाबदारी शांतपणे उत्तम रीतीने पार पाडत राहिले.ते स्वतः अखंड शिकत राहिले, आणि त्यांची उद्योगातील वाट,त्यांनी निर्धारित केलेल्या एका सावकाश गतीने ते चालत राहिले. त्यांच्या जीवनात कुठेही यश मिळवण्यासाठी त्यांनी प्रचंड आटापिटा केला, असं दिसत नाही.त्यांनी त्यांच्या जीवनातील शिखरापर्यंतच्या प्रवासातला क्षणन् क्षण परिपूर्णतेने अनुभवला.त्यांचा हा शांतपणे एका सावकाश गतीने केलेला जीवनप्रवास पाहणं हे आपल्याला जीवनाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणारं आहे.

फार भव्य दिव्य ध्येय डोळ्यासमोर ठेवून त्यांनी आयुष्याचं कालबद्ध गणित मांडल्याचं दिसत नाही.ते प्रत्येक क्षण सजगतेने जगत राहिले.प्रत्येक काम एकाग्रतेने, परिस्थिती पूर्णपणे समजावून घेत,आपली बलस्थाने आणि मर्यादांचा वस्तूनिष्ठ विचार करीत ,सोबत असलेल्या लोकांना सामुहिक क्षमतांचा पुरेपूर वापर करीत सकारात्मक पद्धतीने यशस्वी करता येईल,हा विश्वास देत पार पाडले.

प्रत्येक मनुष्याला जीवनात अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते, तसेच मा.रतन टाटांनाही अनेक आव्हानांचा सामना करावा लागला.त्यांनी विकत घेतलेल्या जग्वार/लँड रोव्हर,कोर्स,टेटली, आणि अशा आंतरराष्ट्रीय दबदबा असलेल्या पण आर्थिक संकटात सापडलेल्या कंपन्या प्रत्यक्ष ताब्यात घेण्याची प्रक्रिया काही साधी सरळ नव्हती.त्यातील आर्थिक, कायदेशीर गुंता तर होताच,पण एवढे मोठे निर्णय व्यावहारिक शहाणपणाचे ठरतील का ? यावरच अनेक अभ्यासकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.रतन टाटांच्या नेतृत्व क्षमतेबद्दलही त्यांना खिन्नता यावी इतका खल खुद्द टाटा ग्रुपच्या विश्वस्तांमधे, खूप मोठी भांडवली गुंतवणूक असणा-या लोकांनी केला.आणि हे अगदी स्वाभाविक आहे.जेव्हा एखादा वयाच्या शंभरीत असलेला उद्योग समूह आपल्यापेक्षा खूप मोठा घास घेण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा त्यातून मिळू शकेल असे यश एका बाजूला खुणावत असले, तरी आपले सर्वकाही पणाला लावत असल्याची जाणीव मन कुरतडत राहते.ही एकप्रकारे नेतृत्वाची अग्निपरीक्षाच असते.

मा.रतन टाटांनी घेतलेल्या या अभूतपूर्व निर्णयांची निष्पत्ती म्हणून त्यांनी मिळवलेले यश ही खूप मोठी अडथळ्यांची शर्यत होती.
टाटा या ब्रँडवर दृढ विश्वास ठेवून गुंतवणूकदारांनी केलेली हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक या निर्णयामुळे पणाला लागली होती.आर्थिक दलदलीत अडकलेली जे.एल.आर. विकत घेऊन स्वतःचे व्यवस्थापकीय कौशल्य पणाला लावून, जगभरात त्या ब्रँडच्या कार पुन्हा दिमाखाने विकून पैसा निर्माण करणं,टाटा ग्रुपच्या उलाढालीत आश्चर्यकारक वाढ करणं, हे सारं अत्यंत अवघड आहे. हे अक्षरशः समुद्र मंथनातून निघालेले हलाहल प्राशन करण्यासारखं आहे.त्यातून अमृत निघालं,तर सगळेच पुढे सरसावतात,पण हलाहल निघालं,तर देवांचे देव महादेवच त्यासाठी हवेत.ते इतरांच्या आवाक्यातलं नसतं. मा.रतन टाटांच्या हाती संपूर्ण टाटा ग्रुपचं नेतृत्व आलं, तेव्हा चार बिलियन डॉलर्स ( चारशे कोटी डॉलर्स ) असलेली उलाढाल त्यांनी त्यांच्या दमदार नेतृत्वाखाली शंभर बिलियन डॉलर्स पर्यंत वाढवली. यावरून त्यांच्या असाधारण गुणवत्तेची, दूरदृष्टीची, व्यवस्थापकीय कौशल्याची, लोकांच्या संपादन केलेल्या अपरंपार विश्वासाची तर कल्पना येते, पण आपण एक व्यक्ती म्हणून त्यांनी किती मानसिक ताण या सर्व घटनाक्रमात अनुभवला असेल,याची कल्पनाच करू शकत नाही.

यशाचे सोबती सगळेच असतात,पण अपयश बिचारे अगदी निराश्रित असते,त्याचे पालकत्व कोणी स्वीकारत नाही.व्यंग घेऊन जन्माला आलेल्या अपत्याकडे आणि त्याच्या आई बापाकडे जसे हे जग फक्त कोरड्या सहानुभूतीने पाहतं, तशीच अवस्था समाज खूप मोठी झेप घेऊन जर अपयश आलं,तर भव्यदिव्य स्वप्न पाहणाऱ्या मनुष्याची करतो. हिंदवी स्वराज्याचा खटाटोप करताना सर्व काही पणाला लावलेल्या छ.शिवाजीराजांना एका दुर्दैवी क्षणी मिर्झा राजा जयसिंह याला तेवीस किल्ले आणि स्वराज्याचा खूप मोठा भूप्रदेश नाईलाजाने द्यावा लागला होता. तो त्यांनी पुन्हा प्रतिकूलतेवर दुर्दम्य इच्छाशक्तीने आणि अतुलनीय पराक्रमाने मात करून आपल्या जीवाला जीव देणा-या सोबत्यांच्या साथीने प्रयत्नांची शर्थ करीत परत मिळवला.पुढे खूप विस्तारला, ज्या प्रेरणादायी स्मृतींचा आत्मगौरव आपण चार शतकांनंतरही डोक्यावर मिरवतो आहोत.

आपल्या आत्मबलाने, विवेकी निर्णयांनी,क्रियाशीलतेने, उत्तम सहकारी निवडून त्यांच्या साथीने,दूरदृष्टीने अलौकिक यश संपादन करता येतं,पण तिथपर्यंतचा प्रवास खूप जीवघेणा असतो, सहनशक्तीची परिक्षा पाहणारा असतो. सर्कसमधे मोकळ्या वर्तुळाकार जागेच्या वर दोन टोकांना दोराने बांधलेल्या झुलत्या काठ्या असतात.त्या दूर असलेल्या काठ्यांवर उलटे लोमकळणारे कसरतपटू त्यांना वेग देत एकमेकांच्या दिशेने झोके घेत असतात.एका क्षणी एक कसरतपटू या काठीचा आधार सोडून हवेत झेपावत क्षणभर अधांतरी होत दुसऱ्या काठीवरील कसरतपटूचे हात घट्ट पकडतो. हे पाहताना शेकडो दर्शकांचा श्वास रोखला जातो.तो क्षणभर इतक्या उंचीवर अधांतरी असलेला कसरतपटू हात निसटून खाली पडला तर ? या नुसत्या कल्पनेनेच आपला थरकाप उडतो.ज्या क्षणी ती अधांतरी अवस्था संपते,तो कसरतपटू समोरच्या साथीदाराचे हा घट्ट धरून मजेत झोके घेऊ लागतो त्या क्षणी तो सुरक्षित असल्याची खात्री झाली,कि शेकडो दर्शक टाळ्यांचा कडकडाट करतात. आपण फक्त दर्शक आहोत,मा.रतन टाटांनी मिळवलेल्या यशाची खात्री झाल्यावर टाळ्या वाजवणारे !

मा.रतन टाटा आहेत भारतीय उद्योग क्षेत्राच्या अर्थकारणातील सर्वोत्तम ट्रॅपिझ आर्टिस्ट !! इतकं मोठं असल्याशिवाय,सारं काही पणाला लावल्याशिवाय कोट्यवधी लोक टाळ्या वाजवत नाहीत, अश्रू ढाळत नाहीत. त्यासाठी खूप मोठं व्हावं लागतं ! खूप मोठं असावं लागतं !! अगदी एकट्यानंच हे अग्नीदिव्य करावं लागतं !!! मा.रतन टाटा असेच अगदी एकटे होते, एकमेव होते.......

या अलौकिक मनुष्याला कृतज्ञ प्रणाम.

## Health Tip चालणे किती महत्वाचे.


**पाय सक्रिय आणि मजबूत ठेवा !!**

मानव जसजसे वर्षे घालवतो तसे रोज म्हातारा होत असतो, म्हणून पाय नेहमी सक्रिय आणि मजबूत असले पाहिजेत. आपण जसजसे म्हातारे होत असतो/वृद्ध होत असतो, तसतसे केस राखाडी होण्याची/ त्वचा निस्तेज/ चेहऱ्यावर सुरकुत्या पडण्याची भीती बाळगू नये.

कृपया दररोज चालत जा.

जर फक्त २ आठवडे पाय हलवले नाही तर पायाची खरी ताकद १० वर्षांनी कमी होईल. म्हणून फक्त चाला. पायांचे स्नायू कमकुवत झाल्यामुळे नंतर पुनर्वसन व कितीही व्यायाम केले तरीही ते बरे होण्यास बराच वेळ लागेल. म्हणून चालण्यासारखा नियमित व्यायाम खूप महत्त्वाचा आहे. आपले २ पाय हे १ प्रकारचे खांब आहेत, जे मानवी शरीराचे संपूर्ण भार सहन करतात.. मजेची गोष्ट म्हणजे, माणसाच्या ५०% हाडे, ५०% स्नायू २ पायांत असतात. मानवी शरीरातील सर्वात मोठे व मजबूत सांधे, हाडेदेखील पायांमध्ये असतात. मजबूत हाडे, मजबूत स्नायू, लवचिक सांधे लोह त्रिकोण बनवतात जो सर्वात महत्वाचा भार वाहतो, म्हणजेच मानवी शरीर ७०% मानवी क्रियाकलाप व व्यक्तीच्या जीवनातील ऊर्जा बर्न दोन पायांनी केली जाते. पाय हे शरीराच्या हालचालींची मुख्य केंद्र आहे. दोन्ही पायांना मिळून मानवी शरीराच्या ५०% नसा, ५०% रक्तवाहिन्या आणि ५०% रक्त त्यामधून वाहत असते. हे शरीराला जोडणारे सर्वात मोठे रक्ताभिसरण नेटवर्क आहे. म्हणून रोज चाला. फक्त जेव्हा पाय निरोगी असतात तेव्हाच रक्ताचा प्रवाह सुरळीत होतो, त्यामुळे ज्यांच्या पायाचे स्नायू मजबूत असतात त्यांचे हृदय नक्कीच मजबूत असते. वृद्धत्व पायांपासून वरच्या दिशेने सुरू होते... एखादी व्यक्ती वृध्द होते तेव्हा मेंदू व पाय यांच्यातील सूचनांच्या प्रसारणाची अचूकता ती व्यक्ती तरुण असतानाच्या तुलनेने कमी कमी होत जाते. कृपया चालत जा. याशिवाय हाडांचे वंगण व कॅल्शियम कालांतराने लवकर नष्ट होते, ज्यामुळे वृद्धांना हाडे फ्रॅक्चर होण्याची अधिक समस्या सतावते. वृद्धांमध्ये हाडांचे विकार अनेक गुंतागुंत निर्माण करू शकतात. विशेषत: मेंदूच्या थ्रोम्बोसिससारखे घातक रोग. अशी वेळ आपल्यावर येऊ नये, म्हणून... रोज न चुकता चाला. पायांचा व्यायाम वयाच्या ६० वर्षांनंतरही निरंतर सुरु ठेवणे आरोग्याच्या दृष्टीनेही हिताचे आहे. पाय कालांतराने हळूहळू म्हातारे होत असले तरी पाय/पायांचा व्यायाम करणे हे आयुष्यभराचे काम आहे. त्यामुळे दररोज चालावे. ‘केवळ नियमितपणे पाय बळकट केल्याने पुढील वृद्धत्व टाळता येते/कमी करता येते. ३६५ दिवस चाला. ‘पायांना पुरेसा व्यायाम मिळावा, पायाचे स्नायू निरोगी राहतील याची खात्री करण्यासाठी कृपया रोज किमान ३०- ४० मिनिटे चाला. माहिती आवडली तर इतर ग्रुप वर शेअर करा

## Good Thought



# Birthday Celebration



रोटरी सेंट्रल चे सीनियर रोटेरियन सूर्यकांत पाटील (अंकल) यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना प्रेसिडेंट आणि  सेक्रेटरी.



रोटरी सेंट्रल चे मार्गदर्शक PDG रो.राजूभाई दोषी याना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना प्रेसिडेंट रो.संजय भगत आणि सेक्रेटरी रो.रवींद्र खोत.



रोटेरियन संजय पाटील यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा




क्लब सेक्रेटरी रो.रवींद्र खोत आणि रो.विशाल वडेर यांचा विकली मिटींग मधे केक कट करुन वाढदिवस साजरा केला




माजी केंद्रीय मंत्री आदरणीय सुरेश प्रभू याच्याबरोबर रोटरी सेंट्रल चे मेंबर रो.निलेश पाटील,रो.संजय कदम,रो.संग्राम कुंभार,रो.आर वाय पाटील,रो.संजय भगत.